www.rajdand.com
सातारा रविवार
२४.२.२०२४
पृष्ठ ४ ! मूल्य ४ !
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९

२५ वर्षे विश्वासार्हतेची

# अशोक चव्हाणांनी काँग्रेसचा खासदार एकवर आणून ठेवला

## नाना पटोले यांचा टीका : गॅरंटी शब्द आमचा, भाजपची गॅरंटी संपलीय

**सातारा :** लोकसभा निवडणुकीसाठी जागा वाटपाचे काम जवळपास निश्चित झाले असून ४२ मतदारसंघात महाविकास आघाडी जिंकण्याचा कल आहे, असा दावा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला. त्याचबरोबर माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण आयुष्यभर काँग्रेससोबत राहिले. त्यांनीच राज्यात काँग्रेसचा खासदार एकवर आणून ठेवला, असा घणाघातही केला. दरम्यान, भाजप गॅरंटी शब्द वापरत आहे. पण, हा शब्द आमचा असून त्यांनी चोरला आहे. या गॅरंटीला त्यांनी अपमानीत केले आहे. त्यांची गॅरंटी आता संपली आहे, असा टोला पटोले यांनी भाजपला लगावला. तसेच धर्म, जातीच्या नावावर राजकारणाचा एक अजेंडा वापरण्याचे काम सुरू असल्याचाही आरोप त्यांनी केला.



सातारा : शिवतीर्थ येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करताना नाना पटोले, डॉ. सुरेश जाधव व इतर.

सातारा जिल्हा दौऱ्यावर आल्यानंतर काँग्रेस कमिटीत आयोजित पत्रकार परिषदेत प्रदेशाध्यक्ष नाना पटोले बोलत होते. यावेळी जिल्हाध्यक्ष डॉ. सुरेश जाधव, जिल्हा प्रभारी श्रीरंग चव्हाण, सरचिटणीस नरेश देसाई, महिला काँग्रेस जिल्हाध्यक्षा अल्पना यादव, रजनी पवार, धनश्री महाडिक, ॲड. विजयराव कणसे, विराज शिंदे आदी उपस्थित होते.

आ. पटोले म्हणाले, राज्यातील मराठा तसेच धनगर समाजाला आरक्षणाच्या नावाखाली २०१४ पासून देवेंद्र फडणवीस फसवत आहेत. भाजपकडून आरक्षणाचा बागुलबुवा केला जात आहे. मराठा आणि ओबीसीत वादाचे बीज भाजपनेच रोवले. आता ते शिखरावर गेले आहे. भाजपमुळेच आरक्षणाला मुठमाती मिळालेली आहे. आता मराठा समाजाला आरक्षण दिल्याचा नुसता गवगवा केला जातोय. यातूनही भाजपने फसविण्याचेच काम केले असून मनोज जरांगे-पाटील आणि समर्थकांतही वाद लावला जात आहे. भाजपकडून आरक्षणमुक्त भारतचा प्रयत्न सुरू आहे. त्यामुळेच पंतप्रधान नरेंद्र मोदीही जातगणना करायला तयार नाहीत, असे सांगून प्रदेशाध्यक्ष पटोले म्हणाले, महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर त्यांच्याकडे उत्तर नाही. दिल्लीजवळ शेतकऱ्यांचे आंदोलन सुरू आहे. त्यांना गोळ्या घालून मारले जात आहे. केंद्र शासनाने केलेले कायदे हे लोकशाही संपष्टात आणण्यासाठीच केले आहेत. पण, देशात आता इंडिया आघाडीचेच सरकार येणार आहे.

पत्रकार परिषदेत माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या काँग्रेस सोडून जाण्याबद्दल आणि त्यांचा रोख आपल्याकडे असल्याचा प्रश्न पत्रकारांनी केला. यावर पटोले यांनी मी मंत्री नव्हतो. मी शेतकऱ्याचा मुलगा आहे. त्यांनी माझ्यावर आरोप करणे स्वाभाविक आहे. पण, ते आयुष्यभर काँग्रेसबरोबर राहिले. पण, पक्षाचा खासदार त्यांनी एकवर आणून ठेवला, असे ठामपणे सांगितले.

**काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आ. नाना पटोले हे शनिवारी साताऱ्यात कार्यक्रमानिमित्त आले होते. त्यांनी साताऱ्यात येताच शिवतीर्थ पोवई नाका येथील छत्रपती शिवाजी महाराज तसेच स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी जय शिवाजी, हर हर महादेव अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. यावेळी सातारा जिल्हा प्रभारी श्रीरंग चव्हाण, जिल्हाध्यक्ष डॉ. सुरेश जाधव, महीला जिल्हाध्यक्ष अल्पना यादव, नरेश देसाई, विराज शिंदे, धनश्री महाडीक, अरबाज शेख आदी उपस्थित होते.**

## पोलादपर शहरामध्ये प्रथमच संत शिरोमणी नरहरी महाराज पुण्यतिथी सोहळा

**पोलादपूर :** तालुक्यातील विश्वकर्मा पंचाल सोनार समाजबांधवांतर्फे पोलादपूर शहरामध्ये प्रथमच संत शिरोमणी नरहरी महाराज पुण्यतिथी सोहळा दि.२७ फेब्रुवारी २०२४ रोजी श्रीदेवी गंगामाता सभागृहामध्ये आयोजित करण्यात आला आहे. याप्रसंगी सोनार समाजात अन्य समाजामधून विवाहबध्द होऊन आलेल्या कर्तृत्ववान महिलांच्या सत्काराचे नियोजन करण्यात आले असून सोनार समाजातील महिलांचादेखील यामध्ये समावेश आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून महाड तालुक्यातील चोचिंदे येथे संत शिरोमणी नरहरी महाराज पुण्यतिथी सोहळ्याला उपस्थिती दर्शविणाऱ्या पोलादपूर येथील पंचाल सोनार समाजबांधवांनी यंदा प्रथमच पोलादपूर तालुक्यामध्ये या सोहळ्याचे आयोजन केले आहे. महाड तालुक्यातील चोचिंदे येथील समाजमंदिरामध्ये पूरस्थितीमध्ये पाणी जाऊन मंदिराचे नुकसान होत असल्याने जिर्णोध्दाराची तयारी करून आर्थिक नियोजनासाठी पोलादपूर तालुक्यातील समाजबांधवांना गृहित धरण्यात आले.

# महाविकास आघाडीतील जागा वाटपाचा तिढा सुटणार

### नानांनी दिली तारीख !



आगामी काळात होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडी सज्ज आहे. मात्र अद्याप लोकसभेच्या जागा वाटपासंदर्भातील तिढा सुटला नाही आहे. त्यासाठी 'तारीख पे तारीख' महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून त्यातही नाना पटोले यांच्याकडून दिली जात होती. मात्र आता जागा वाटपाचा तिढा सुटण्याची तारीख खुद्द काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी फिक्स केली आहे.

२७, २८, २९ फेब्रुवारी होणाऱ्या संयुक्त बैठकीत जागा वाटपाचा तिढा सुटणार आहे. जागा वाटपाचे दावे-प्रतिदावे होत असले तरी जे ठरेल, ते आघाडी धर्मानुसार पाळले जाईल, असे नाना पटोले यांनी सांगितले. कचारगड येथे सुरू असलेल्या कोयापुनेम महोत्सवात सहभागी होण्यासाठी पटोले काल (ता. २३) गोंदिया जिल्ह्यात आले होते. तेव्हा रात्री उशिरा त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी नानां पटोले यांनी भाजपवर निशाणा साधला.

भाजप सरकार सर्वसामान्य नागरिक, मध्यमवर्गीय कर्मचारी तसेच देशाच्या पोशिंदा असलेल्या शेतकरी विरोधी आहे. हक्कासाठी लढा उभारत असतानाही त्या आंदोलनाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते. उलट आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांना खलीस्तानी, आंदोलनजिवी म्हणून संबोधले जाते. त्यामुळे भाजप सरकार शेतकरी विरोधी आहे, असा आरोप त्यांनी केला.

लोकसभा निवडणुकीबाबत बोलताना ते म्हणाले, गेल्या अनेक वर्षांपासून गोंदिया, भंडारा व गडचिरोली जिल्ह्यात पंजा हे चिन्ह उमेदवाराच्या माध्यमातून दिसून आले नव्हते. मात्र आगामी निवडणुकीत निश्चितपणे काँग्रेसचे निवडणूक चिन्ह दिसून येणार आहे, असे सांगत त्यांनी दोन्ही लोकसभा मतदारसंघांत काँग्रेस निवडणूक लढविणार, असल्याचे सुतोवाच केले. अर्थात नानांनी दोन्ही लोकसभा मतदारसंघावर दावा केला आहे.

मंगळवारपासून होणारी महाविकास आघाडीची बैठक महत्वाची ठरणार आहे. असे असले तरी महाराष्ट्रातील किती जागांवर महाविकास आघाडीतील घटक पक्ष लढविणार, हे बैठकीनंतरच निश्चित होईलच. दरम्यान त्यांच्यासोबत आमगाव-देवरीचे आमदार सहषराम कोरोटे, जिल्हाध्यक्ष दिलीप बन्सोड, जिल्हा परिषद सदस्य जितेंद्र कटरे, सोनू नेताम, नामदेवराव किरसान, संदीप भाटीया, सुनंदाताई बहेकार, ओमप्रकाश रामटेके, मीनाताई राऊत, उषा शहारे, राधिका धरमगुडे, रंजित कासम, प्रल्हाद सलामे, भारती सलामे, अनुसया सलामे, राजू चांदेवार आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विधानमंडळातील मध्यवर्ती सभागृहात कुसुमाग्रज साहित्य जागर

**मुंबई :** महाराष्ट्र विधानमंडळातील मध्यवर्ती सभागृहात यंदाच्या मराठी भाषा गौरव दिनी म्हणजे २७ फेब्रुवारी, २०२४ रोजी ''कुसुमाग्रज साहित्य जागर'' मांडला जाईल.

कविश्रेष्ठ कुसुमाग्रज तथा वि.वा.शिरवाडकर यांचा २७ फ ेब्रुवारी हा जन्मदिवस ''मराठी भाषा गौरव दिन'' म्हणून साजरा केला जातो. मराठी भाषेची गौरवशाली परंपरा जपण्यासाठी व तिचे संवर्धन करण्यासाठी मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातर्फे दिनांक २७ फ ेब्रुवारी, २०२४ रोजी दुपारी ४.०० ते ६.०० यावेळेत ''कुसुमाग्रज साहित्य जागर'' या कार्यक्रमाचे संयोजन विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, डॉ. नीलम गोऱ्हे आणि विधानसभेचे उपाध्यक्ष श्री. नरहरी झिरवाळ यांच्या संकल्पनेनुसार करण्यात आले आहे.

# उत्तर प्रदेशात राहुल गांधींना पाठिंबा देण्यासाठी प्रियांका मैदानात

## अखिलेशही भारत जोडो न्याय यात्रेत सहभागी होणार



**मुरादाबाद :** राहुल गांधींची भारत जोडो न्याय यात्रा उत्तर प्रदेशातील मुरादाबादला पोहोचली, तेव्हा ते एकटे नव्हते, त्यांच्याबरोबर त्यांची बहीण प्रियंका गांधी वड्रादेखील खुल्या जीपमध्ये बसल्या होत्या. मुरादाबाद आणि आजूबाजूच्या परिसरातील लोकांनी राहुल-प्रियांका यांचे जंगी स्वागत केले. राहुल आणि प्रियांका गेल्या अनेक दिवसांपासून उत्तर प्रदेशात सुरू असलेल्या भारत जोडो न्याय यात्रेत पहिल्यांदाच एकत्र दिसले होते. उत्तर प्रदेशात गेल्या निवडणुकीत काँग्रेससाठी मेहनत घेतलेल्या प्रियंका गांधी यांना रस्त्यावर पाहून काँग्रेस समर्थकही चांगलेच जल्लोषात होते.

याआधी चंदौलीतच राहुल यांच्या भेटीला प्रियंका गांधी सहभागी होणार असल्याच्या बातम्या आल्या होत्या, मात्र त्यांच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला होता. आता राहुल गांधींच्या उत्तर प्रदेश दौऱ्याला शेवटचे २ दिवस बाकी असताना प्रियांकाही त्यांना पाठिंबा देण्यासाठी आल्या आहेत. आज मुरादाबादहून निघून राहुल गांधींची भारत जोडो न्याय यात्रा उद्या आग्राला पोहोचणार आहे. उद्या आग्रा येथे होणाऱ्या यात्रेकडे संपूर्ण देशाचे लक्ष असेल. उद्या अखिलेश यादवही राहुल गांधींच्या लाल जीपमध्ये बसतील. प्रदीर्घ चर्चा आणि बैठकीनंतर अखेर सपाने यूपीमध्ये काँग्रेसला १७ जागा दिल्या, त्यानंतर राहुल आणि अखिलेश पहिल्यांदाच एकत्र दिसणार आहेत. यूपीमधील दोन मोठ्या विरोधी नेत्यांचे एकत्र येणे इंडिया आघाडीसाठी संजीवनीपेक्षा कमी नाही. काँग्रेसच्या अंतर्गत सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन वर्षापूर्वीपर्यंत पक्षाच्या यूपी कारभाराचा प्रभारी असलेले काँग्रेस नेते राहुल यांच्याबरोबर असतील, कारण ही यात्रा मुरादाबादमधून मार्गक्रमण करते आणि त्यानंतर अमरोहा, संभल, बुलंदशहर, अलिगढ, हाथरस आणि आग्रा मार्गे प्रवास करणार आहे. रविवारी फतेहपूर सिक्री येथे यात्रेचा समारोप होईल. समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव हे २५ फेब्रुवारीला आग्रा येथील यात्रेत सामील होतील.२६ फेब्रुवारी ते १ मार्चपर्यंत यात्रा स्थगित असणार

२६ फेब्रुवारी ते १ मार्च या कालावधीत न्याय यात्रेला ब्रेक लागणार असल्याचे काँग्रेसने सांगितले. २७ ते २८ फेब्रुवारी रोजी राहुल गांधी ब्रिटनच्या केंब्रिज विद्यापीठात व्याख्यान देण्यासाठी जाणार आहेत. मात्र, २ मार्चपासून मध्य प्रदेशातून हा प्रवास पुन्हा सुरू होईल. ५ मार्च रोजी राहुल गांधी उज्जैन येथील महाकालेश्वर मंदिराला भेट देणार आहेत. या काळात ते नवी दिल्लीतील महत्त्वाच्या बैठकांनाही हजर राहतील, असे त्यात म्हटले आहे. २ मार्च रोजी दुपारी २ वाजता धौलपूर येथून हा प्रवास पुन्हा सुरू होईल. त्यानंतर यात्रा मध्य प्रदेशात जाणार आहे आणि मुरैना, ग्वाल्हेर, शिवपुरी, गुना, शाजापूर आणि उज्जैनसह राज्यातील इतर जिल्ह्यांमधून प्रवास करतील. यात्रा २६ फेब्रुवारी ते १ मार्च या पाच दिवसांसाठी स्थगित करणार येणार असून, यादरम्यान राहुल गांधी यांना त्यांच्या अल्मा माटर केंब्रिज विद्यापीठात दोन व्याख्याने देण्यासाठी यूकेला जाण्याची परवानगी मिळेल. तसेच नवी दिल्लीतील महत्त्वाच्या बैठकांना उपस्थित राहता येणार आहे.

**तृणमूल काँग्रेस आणि नॅशनल कॉन्फरन्स यांच्याशी चर्चा झाल्याचा काँग्रेसचा दावा**

उत्तर प्रदेशमधील जागावाटपाचा तिढा सुटलेला असताना महाराष्ट्र आणि बिहार यांसारख्या इतर राज्यांमध्ये जागा वाटपाचे करार अंतिम करण्यासाठी किती वेळ लागेल हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

# कर्नाटकमध्ये काँग्रेसला मोठा धक्का, मंदिरांच्या उत्पन्नांबाबतचे विधेयक विधानपरिषदेत नामंजूर!

**कर्नाटक :** कर्नाटक राज्यात 'कर्नाटक हिंदू रिलिजिअस इन्स्टिट्यूशन अँड चॅरिटेबल एन्डॉम ेंट्स(अमेंडमेंट) ॲक्ट २०२४' या नव्या कायद्यामुळे चांगलाच वाद रंगला आहे. विरोधी बाकावर असलेल्या भाजपाकडून या कायद्याला विरोध केला जात आहे. विधानपरिषदेत भाजपा आणि जेडीएस या दोन्ही पक्षांनी या कायद्याविरोधात मतदान केले आहे. त्यामुळे बहुमत न मिळाल्यामुळे विधानपरिषदेत हा कायदा नामंजूर करण्यात आलाय. उपसभापती एम के प्रणेश यांच्या संमतीने हा कायदा शुक्रवारी (२३ फेब्रवारी) विधानपरिषदेत मंजुरीसाठी पटलावर ठेवण्यात आला होता.

**''सरकार मंदिरांची संपत्ती लुटू पाहतंय''**

**कर्नाटकमधील वेगवेगळ्या धार्मिक कार्यांना मदत म्हणून या कायद्यात 'कॉमन पूल फंड'ची तरतूद करण्यात आली आहे. भाजपाने मात्र या कायद्याला विरोध केला आहे. सरकार राज्यासाठी मंदिरांची संपत्ती लुटू पाहात आहे, अशी टीका भाजपाने केली. विधानपरिषदेत सत्ताधारी काँग्रेसचे संख्याबळ कमी आहे. येथे ७५ सदस्यीय सभागृहात भाजपाचे ३४ तर जेडीएसचे ८ आमदार आहेत. काँग्रेसचे या सभागृहात ३० आमदार आहेत. याआधी विधानसभेत हा नवा कायदा बहुमताने मंजूर करण्यात आला. विधानसभेत काँग्रेसचे २२४ पैकी १३५ आमदार आहेत.**

या कायद्याच्या माध्यमातून राज्य सरकार राज्यातील मंदिरांवर नियंत्रण मिळवू पाहात आहे, असा दावा भाजपाने केला आहे. लोकसभा निवडणूक अवघ्या काही महिन्यांवर आलेली असताना हा कायदा कर्नाटकमध्ये वादाचे कारण ठरला आहे. भाजपाने हा मुद्दा चांगलाच लावून धरला आहे.

**कायद्यात काय तरतूद आहे?**

**ज्या मंदिरांचे वर्षिक उत्पन्न हे १ कोटींपेक्षा अधिक आहे, त्या मंदिराच्या एकूण उत्पन्नापैकी १० टक्के रक्कम ही कॉमन पूल फंडात जमा करण्याची तरतूद या कायद्यात आहे. मंदिरांच्या देखभालीसाठी हा निधी वापरला जाईल, असे सरकारचे म्हणणे आहे.**

## माथाडी कायदा मोडीत काढणारे विधेयक व कामगार विरोधी जीआर मागे घेण्याबद्दल

# आझाद मैदान येथे पदाधिकारी, कामगार-कार्यकर्त्यांचे आमरण उपोषण!

**मुंबई :-** माथाडी अधिनियम, १९६९ सुधारणा विधेयक क्रमांक ३४ हे माथाडी कायदा संपुष्टात आणणारे आणि सुमारे ८०% माथाडी कामगारांना बेरोजगार करणारे असल्याने ते मागे घ्यावे आणि शासनाच्या पणन विभागाने काढलेले दि.१६ जानेवारी, २०२४ चे परिपत्रक मागे घ्यावे तसेच माथाडी कामगारांच्या इतर न्याय्य प्रश्नांची सोडवणुक होण्यासाठी तातडीने मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली उपमख्यमंत्री गृह व वित्त, कामगार मंत्री, कामगार, पणन, गृह विभागाचे अधिकारी यांची माथाडी कायदा बचाव कृती समितीबरोबर संयुक्त बैठक आयोजित करावी या मागणीसाठी महाराष्ट्रातील तमाम माथाडी कामगारांचे प्रतिनिधीत्व करणारे प्रमुख माथाडी कामगार संघटनांचे नेते व कार्यकर्ते दि.२६ फेब्रुवारी सकाळी ९:०० वाजल्यापासून आझाद मैदान, मुंबई येथे आमरण उपोषण आंदोलन करणार आहेत.



Dr. BABA ADHAV — SHASHIKANT SHINDE — NARENDRA ANNASAHEB PATIL

जेष्ठ समाजसेवक - जेष्ठ कामगार नेते डॉ. बाबा आढाव व माजी आमदार नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखालील राज्य स्तरीय माथाडी कायदा बचाव कृती समितीच्यावतिने हे आंदोलन करण्यात येणार असून, या कृती समितीमध्ये आमदार शशिकांत शिंदे, आमदार भाई जगताप, गुलाबराव जगताप, बळवंतराव पवार, अविनाश रामिष्टे, अरुण रांजणे, शिवाजी सुर्वे, निवृत्ती धुमाळ, नंदाताई भोसले, लक्ष्मणराव भोसले, दत्ता घंगाळे, सतीशराव जाधव आदी नेत्यांचा समावेश आहे.

माथाडी अधिनियम, १९६९ सुधारणा विधेयक क्र.३४ मागे घेऊन या अधिनियमातील तरतुदीनुसार महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजिवी कामगार सल्लागार समितीची व विविध माथाडी मंडळांच्या पुनर्रचना करुन अनुभवी कामगार नेत्यांची सदस्य म्हणून नेमणुक करावी, विविध माथाडी मंडळात माथाडी कामगारांच्या शिकलेल्या मुलांचीच भरती करावी, माथाडी अधिनियमाचा दुरुपयोग केला जात आहे,

त्यासंदर्भात माथाडी कायदा बचाव कृती समितीने दिलेल्या सूचनांनुसार उपाययोजना होणे, शासनाच्या कामगार, पणन विभागाकडून माथाडी, वारणार, मापाडी कामगारांवर अन्याय करणारे शासन जीआर काढले आहेत ते तातडीने मागे घ्यावे, असे जीआर काढण्यापुर्वी कामगारांचे प्रतिनिधीत्व करणा-या संघटनांना विश्वासात घेतले जात नाही तसेच हिवाळी अधिवेशाना दरम्यान नागपूर येथे झालेल्या बैठकितील निर्णयाची अंमलबजावणी होत नाही याकरीतां आणि राज्य सरकार दिलेला शब्द पाळत नसल्याच्या निषेधार्थ हा आमरण उपोषणाचा निर्णय घेण्यात आला आहे.

# ईशान्येकडे सर्वपक्षीयांनी लक्ष द्यावे

जवळपास नऊ- दहा महिन्यांपासून मणिपूर हिंसाचारात होरपळत आहे आणि मतैई आणि कुकी लोकांमधील जीवघेणा संघर्ष याला कारणीभूत आहे. तेथील उच्च न्यायालयाने मतैई समाजाचा अनुसूचित जातींमधे समावेश करावा, असे आदेश गेल्या वर्षी राज्य सरकारला दिले, हे निमित्त ठरले मात्र राजधानी इम्फाळ आणि आसपासच्या परिसरातील मतैई आणि डोंगरी, जंगलात राहणार कुकी यांच्यातील संघर्ष.

या संघर्षांला पार्श्वभूमी आहे ती जमीन, जंगल, संपत्तीची. ईशान्येतील राज्यांतील अनेक जाती- जमातींमधे नेहमीच संघर्ष होतात. मात्र गेल्या वर्षी झालेल्या हिंसाचारात शेकडो जीव गेले, कोटय़वधी रुपयांची वित्तहानी झाली आणि सर्वात भयंकर घटना म्हणजे मणिपूरमध्ये महिलांची नग्न धिंड काढून त्यांच्यावर अमानुष अत्याचार करण्यात आले. ही घटना देशाला मान खाली घालायला लावणारी होती. दोन-तीन महिन्यांनंतर ही घटना देशासमोर आली आणि देशाला हादरवून सोडले. तेथील राज्यपाल वारंवार केंद्र सरकारला अहवाल पाठवीत होत्या मात्र तेथील सरकार, प्रशासनाने गांभीर्याने लक्ष दिले नाही, म्हणून सर्वोच्च न्यायालयाला दखल घ्यावी लागली आणि मणिपूरमधील यंत्रणा कोलमडल्याची टिप्पणी करावी लागली. आता झालेला निर्णय हे उशिरा सुचलेले शहाणपण आहे. वेळीच चुकीची दुरुस्ती करता आली असती. अजूनही मणिपूरमध्ये हिंसाचार होत आहे. ईशान्येकडील सातही राज्ये ही अतिशय संवेदनशील समजली जातात. तिथे चीनचा धोकाही कायम असतो, हे भारताला परवडणारे नाही. झाले तेवढे पुरे झाले किमान आता तरी ईशान्य भारतात शांतता निर्माण होणे गरजेचे आहे. यासाठी केंद्र व राज्य सरकारने आणि सर्वपक्षीय नेत्यांनी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन सकारात्मक प्रयत्न करायला हवेत.

माहिती आणि सूचना प्रसारण मंत्रालयाने गृह खात्याच्या विनंतीनंतर शेतकरी आंदोलनाशी निगडित १७७ समाजमाध्यम खाती आणि लिंक ब्लॉक करण्याचे आदेश दिले. 'एक्स'ने शेतकऱ्यांशी निगडित पोस्ट आणि हँडल्स हटविण्याबाबत केंद्र सरकारच्या आदेशाशी असहमती दर्शविली. सरकारबरोबर चर्चेची चौथी फेरी निष्फळ ठरल्यानंतर शेतकरी संघटनांनी पुन्हा एकदा 'चलो दिल्ली' आंदोलनाची हाक दिली होती. या आंदोलनादरम्यान एका आंदोलनकर्त्यांचा नुकताच मृत्यू झाला. शेतकऱ्यांचे आंदोलन लांबल्यास सत्ताधाऱ्यांचे नुकसान होणार आहे. मागचे आंदोलन दीड वर्ष सुरू होते. हे आंदोलनही त्याच वाटेने जात आहे. महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकरीही सध्या 'दिल्ली चलो'च्या आंदोलनासाठी तयारीत आहेत.

भारतावरही कर्जाचा बोजा दिवसेंदिवस वाढत आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने नुकताच यासंदर्भात धोक्याचा आणि सावधगिरीचा इशाराही दिला आहे. पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असलेल्या भारताचा मानव विकास निर्देशांकात १८० देशांमध्ये १३१वा क्रमांक आणि भूक निर्देशांकात १२५ देशांमध्ये १११ वा क्रमांक लागतो. जागतिक अन्न संघटनेच्या अहवालानुसार ७४ टक्के भारतीयांना पौष्टिक आहार मिळू शकत नाही. १५ ते ४९ वर्षे वयोगटातील निम्म्या स्त्रिया कुपोषित आहेत. पर्यावरणाचे संवर्धन करण्याऐवजी मोठमोठय़ा जंगलांत वृक्षतोड करून उद्योग प्रकल्पांची उभारणी केली जात आहे. यात विकासाच्या नावाखाली १० कोटींहून अधिक नागरिकांना विस्थापित करून त्यांचे समाधानकारक पुनर्वसन केलेले नाही. देशावर आधीच एवढा कर्जाचा बोजा असलेल्या सरकारने नागरिकांच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी आणखी कर्जे घेतल्यास भारतावरदेखील कर्जफेडीचा विळखा येण्याची वेळ निश्चितच दूर नसेल.

आरेचे कुर्ला, वरळी आणि गोरेगाव येथील सर्व दुग्धव्यवसाय प्रकल्प एकामागोमाग बंद पडले. त्यानंतर गोरेगाव येथील महानंद प्रकल्प गुजरातस्थित राष्ट्रीय दुग्धविकास मंडळाला (एनडीडीबी) चालवण्यासाठी देण्याची प्रक्रिया संचालकांच्या सामूहिक राजीनाम्यानंतर वेगाने सुरू होणार आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी दूध विकास मंडळाच्या कामातील उदासीनता आणि महाराष्ट्र सरकारच्या नियोजनशून्य धोरणामुळे गुजरातच्या अमूल दुध आणि दुग्धजन्य पदार्थांना मुंबई आणि महाराष्ट्रातील अन्य शहरांतील बाजारपेठ सहज काबीज करता आली. महानंदचे दुखणे राष्ट्रीय दुग्धविकास मंडळाला सोपवून सरकार सुटकेचा श्वास घेईल. तर अमूलला मोठी बाजारपेठ मिळवल्याचा दुग्धानंद होईल. परंतु महानंदच्या बहुसंख्य कामगारांना मात्र आपला रोजगार गमवावा लागणार. मोठय़ा प्रमाणात कामगार कपात आणि संचालक मंडळाचा शून्य हस्तक्षेप या दोन मुख्य अटींवर गुजरातस्थित राष्ट्रीय दुग्धविकास मंडळाने तोटय़ातील महानंद स्वीकारण्याची तयारी दाखवली आहे. महाराष्ट्रातील महत्त्वाचा दुग्धव्यवसाय गुजरातच्या ताब्यात जाणार आहे याचे कणभरही दु:ख महाराष्ट्र सरकारला वाटणार नाही. परंतु महानंदच्या कामगारांना बहुसंख्येने ऐच्छिक निवृती घेण्यास भाग पाडले जाणार हे निश्चित आहे. त्यामुळे महानंद प्रकल्पातील गोरगरीब कामगारांच्या महानंदाला ग्रहण लागेल, हे सुद्धा तितकेच खरे आहे.

प्राथमिक आणि माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या पालकांना हा अनुभव अनेकदा येतो. काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्र्यांनी (फोटोसहित) विद्यार्थ्यांना उद्देशून लिहिलेल्या पत्रास विद्यार्थ्यांनी प्रतिक्रिया द्यायची, असा उपक्रम राबविण्यात आला.

उपक्रम थेट अभ्यासक्रमाशी निगडित असेल तर शंका घ्यायचे अजिबात कारण नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होणार असेल, तरी कोणाची ना नाही. पण त्याचे फोटो शासनाच्या संकेतस्थळावर पाठवण्याचा आग्रह मात्र शंकेस जागा निर्माण करतो. हे प्रकार हल्ली फारच वाढले आहेत. सध्या सुरू असलेल्या, 'माझी शाळा सुंदर शाळा' प्रकल्पाचे उदाहरण घेऊया.. कालपेक्षा मी आणि माझी शाळा आज अधिक सुंदर- स्वच्छ कशी असेल? इतका साधा विचार खरेतर पुरेसा होता. पण त्यासाठी कशाला हवी आहे जिल्हा-राज्यस्तरीय स्पर्धा? आणि मग त्यासंबंधीचे फोटोसेशन? आज घोकंपट्टीने विद्यार्थ्यांचे बरेचसे आयुष्य कुरतडले जात असताना जीवनविषयक साधी मूल्ये शिकवण्यास कोणासही हरकत नाही. मात्र त्यासोबत येणाऱ्या अनावश्यक गोष्टींस कचरापेटी दाखवून विद्यार्थ्यांच्या शाळांसह त्यांचे जीवनही अधिक सुंदर-स्वच्छ करता येईल.

जमावाने चोरटय़ास पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले खरे मात्र, हा चोर सहा महिन्यांची शिक्षा भोगून बाहेर येऊन पुन्हा चोऱ्या सुरू करेल, अशी शक्यता दिसते. पोलीस ठाण्यात वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर विरोधकांवर गोळय़ा झाडणे, पूर्ववैमनस्यातून प्रतिस्पर्ध्याला स्वत:च्या कार्यालयात बोलावून ठार करणे, राजकीय व्यासपीठावरून विरोधकांस भरसभेत हिंसक धमक्या देणे, हे सर्व पाहून सामान्य माणूस भेदरला आहे. अशा स्थितीत सत्ताधारी विचारत आहेत, 'गाडीखाली श्वान आला तर सरकार जबाबदार कसे?' सगळा दोष पोलिसांवर टाकून मोकळे होता येणार नाही. सराईत खिसेकापू, चोर, दरोडेखोर, बलात्कारी किंवा खुनाचे गुन्हे असलेले जामिनावर किंवा किरकोळ शिक्षा भोगून बाहेर येणार असतील तर पोलीस तरी काय करू शकणार आहेत? गुन्हेगारांवर पोलिसांचा वचक तेव्हाच राहील, जेव्हा गुन्हेगारांना कठोर शिक्षा ठोठावली जाईल.



## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या चिन्हांच्या लोकार्पण सोहळा निमित्त साखर पेढे वाटून आनंद साजरा

**कुरुंदवाड :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद चंद्र पवार पक्षाचा तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हाचा रायगड येथे झालेल्या लोकार्पण सोहळ्याचा कुरुंदवाड येथे साखर पेढे वाटून आनंद उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी तुतारी घेतलेल्या माणसाला पुष्पहार घालून पेढा भरवून सत्कार करण्यात आला.

येथील पालिका चौकात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाच्या शिरोळ तालुका व कुरुंदवाड शहर पदाधिकाऱ्यांनी पक्षाच्या चिन्हाचे लोकार्पण झाल्याचा आनंद साजरा करत.शरद पवारांच्या विजयाच्या घोषणा देत परिसर दणाणून सोडले.

यावेळी शरद पवार गटाचे शिरोळ तालुका विधानसभा क्षेत्र अध्यक्ष बबलू पवार म्हणाले गेली पाच ते सहा दशके महाराष्ट्र राज्यातील राजकारणातील जाणता राजा म्हणून शरदचंद्र पवार यांच्याकडे पाहिले जाते. पक्षातील काहींनी गद्दारी करून पक्ष आणि चिन्ह काढून घेतले असले तरी नव्या दिमतीने पुन्हा नवा पक्ष आणि नवा चिन्ह घेऊन जनतेपुढे जात आहे.तुतारी वाजवणारा माणूसही एक नव्या राजकारणाची ललकारी पवार साहेबांनी दिली असून जनतेने याचे स्वागत केले आहे. शहराध्यक्ष तानाजी आलासे,रमेश भुजुगडे,रामचंद्र मोहिते आदींनी मनोगते व्यक्त केली.चौकात साखर-पेढे वाटून आनंद साजरा केला.यावेळी आर.आर पाटील,सिकंदर सारवान,अनिल चव्हाण,असिफ घोरी,आण्णाप्पा आवळे आदी उपस्थित होते.

## लोणंद शहराची २४७ पाणीपुरवठा योजना अखेर मंजूर

**लोणंद :** महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) अंतर्गत लोणंद शहरासाठी नवीन पाणीपुरवठा योजनेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग पुणे चे मुख्य अभियंत्यांनी योजनेस तांत्रिक मंजुरी दिल्यानंतर प्रशासकीय मान्यतेसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवण्यात आला होता त्यास मंजुरी मिळाली असल्याची माहिती लोणंद राष्ट्रवादीकडून पत्रकार परिषदेत देण्यात आली.

सदर पाणीपुरवठा योजनेचा आराखडा हा एकूण ६६.१७ लक्ष रुपये आहे. लोणंद शहराचा विस्तार वाढू लागल्याने दिवसेंदिवस पाणीपुरवठ्याची समस्या गंभीर होत असल्याने लोणंद नगरपंचायतीच्या निवडणुकीमध्ये मकरंद पाटील यांनी लोणंदकरांना शब्द दिला होता त्या आश्वासनाची वचनपूर्ती आज पाणीपुरवठा योजनेस मंजुरी मिळवून देऊन पूर्ण केला आहे असे लोणंद राष्ट्रवादीकडून सांगण्यात आले . ही योजना शहराला शुद्ध पाणीपुरवठा होण्यासाठी वीर जलाशयातून करण्याचा निर्णय सत्ताधारी गटाकडून घेण्यात आला, या योजनेचे लोणंद एमआयडीसी जवळील गायरान जागेत जलशुद्धीकरण केंद्र उभारण्यात येणार आहे,

## भारतीय लोकशाही आदर्शाकडून तत्त्वशून्य राजकारणाकडे : प्रा.नागनाथ चौबे

**कराड :** आज जगातील ६८% देशांमध्ये लोकशाही शासनव्यवस्था अस्तित्वात आहे. इंग्लंड मधील इकॉनॉमिस्ट ग्रुपने जागतिक जो लोकशाहीचा निर्देशांक काढला आहे, त्यात भारतीय लोकशाही ४२ व्या क्रमांकावर असलेली दिसते. दिवसेंदिवस हा क्रमांक घटत असून, हा घटता निर्देशांक भारतीय लोकशाही व्यवस्थेला प्रतिकूल आहे. थोडक्यात भारतीय लोकशाहीची वाटचाल आदर्शाकडून तत्वशून्य राजकारणाकडे होत असलेली दिसते असे प्रतिपादन प्रा.नागनाथ चौबे यांनी केले.

बापूजी साळुंखे महाविद्यालय कराड येथे राज्यशास्त्र विभाग आणि अग्रणी विभागाच्या वतीने आयोजित एक दिवसीय कार्यशाळेच्या प्रसंगी ते प्रथम सत्रात मार्गदर्शन करताना बोलत होते यावेळी प्रा.अजित पवार, प्रोफेसर प्राचार्य डॉ.सतीश घाटगे, प्रा.डॉ.अवधूत टिपूगडे, प्रा.सचिन बोलाईकर आदी प्रमुख उपस्थितीत होते.



प्रा.नागनाथ चौबे पुढे म्हणाले, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर गेल्या ७५ वर्षात भारताने अनेक क्षेत्रांमध्ये विकासात्मक बदल घडवून आणले आहेत. राजकारणात मात्र नकारात्मक बदल झालेले दिसून येत आहेत. एकंदरीतच विवेकहीन राजकारणामुळे भारतीय लोकशाही तत्वे धोक्यात आली आहेत. या पार्श्वभूमीवर तरुणांनी तत्त्व शून्य राजकारणाला पाठिंबा न देता लोकशाही पूरक विचारांची कास धरणे अपेक्षित आहे.

प्रा.अजित पवार यांनी आपल्या मनोगतात सध्याची लोकशाही आणि राजकारण यावर सखोल विवेचन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानावरून प्रोफेसर प्राचार्य डॉ.सतीश घाटगे म्हणाले, जगात आदर्शवादी आपली भारतीय लोकशाही आहे. त्यामुळे लोकशाही समृद्ध करण्याची जबाबदारी हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे कर्तव्य आहे. लोकशाही बळकटीकरणाच्या प्रक्रियेमध्ये तरुणांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. याशिवाय राजकारणाचे गुन्हेगारीकरण थांबवण्यासाठी योग्य लोक राजकारणात येणे देखील तितकंच महत्त्वाचं आहे.

कार्यशाळेचे प्रास्ताविक प्रा.सचिन बोलाईकर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ.अवधूत टिपूगडे यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ.ज्योती कांबळे यांनी केले तर आभार प्रा.गोरख गायकवाड यांनी मानले. अग्रणी महाविद्यालय आणि राज्यशास्त्र विभागाच्या प्राध्यापकांनी कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

## तत्वनिष्ठ महामेरू - स्व.लक्ष्मणराव पाटील (तात्या)



**सर्वसामान्य कार्यकर्त्याला ताकद देत राजकारणाची दारे खुली करून विकासाची गंगा घरोघरी पोचवण्यात माजी खासदार स्वर्गीय लक्ष्मणराव पाटील तात्यांचा सिंहाचा वाटा आहे. आज (२५ फेब्रुवारी) तात्यांची जयंती. त्यानिमित्ताने त्यांच्या स्मृतींचा जागर......**

सातारा जिल्ह्याच्या पाच दशकांच्या राजकारणावर तात्यांच्या नावाची मुद्रा कोणालाच पुसता येणार नाही. स्थानिक स्वराज्य संस्थेपासून प्रत्येक पायरीवर कळस चढवत पुढे आलेले नेतृत्व म्हणजे स्वर्गीय लक्ष्मणराव पाटील. जवळपास पाच दशकं जिल्ह्याचे राजकारण त्यांच्याभोवती फिरत राहिले. तात्यांनी प्रारंभी काँग्रेस पक्षाचा म्हणजेच यशवंतराव चव्हाणसाहेब आणि आबासाहेब वीर यांच्या नेतृत्वाचा स्वीकार केला. साधी राहणी, प्रभावी व्यक्तिमत्त्व, कार्यकर्त्यांशी सहज संवाद, स्पष्टवक्तेपणा आणि प्रचंड महत्त्वाकांक्षा ही तात्यांची खासियत!

राष्ट्रवादीच्या स्थापनेपासून त्यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे नेतृत्व मानून बाणेदारपणे राजकारण केले. गावचे सरपंच, खरेदी-विक्री संघाचे चेअरमन, वाई पंचायत समितीचे सभापती, सातारा जिल्हा परिषदेचे सलग अकरा वर्षे अध्यक्ष, किसन वीर सहकारी साखर कारखान्याचे सलग दहा वर्षे अध्यक्ष, जिल्हा बँकेचे दीर्घकाळ संचालक व अध्यक्ष, सातारा लोकसभा मतदारसंघाचे सलग दहा वर्षे खासदार, जनता शिक्षण संस्थेचे विश्वस्त म्हणून लौकिक गाजवणारे ते एकमेव नेते ठरले. ज्येष्ठ नेते या बिरूदाला साजेसे काम त्यांनी केले. तरीही ते स्वत:ला अखंड कार्यकर्ताच समजत राहिले. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष असताना त्यांनी केलेले काम साताऱ्याला देश पातळीवर घेऊन गेले. शासनाच्या विविध योजना जिल्ह्यात तडफेने राबवल्या. बंडातच पुढच्या यशाची बीजे रोवली जातात. शरद पवार साहेबांनी 'राष्ट्रवादी' ची स्थापना केली आणि तात्यांची बॅटिंग सुरू झाली. पवार साहेबांनी त्यांच्यावर मोठा विश्वास टाकत त्यांच्याकडे जिल्ह्याचे नेतृत्व सोपवले. विधानसभेच्या दहापैकी नऊ जागांवर घवघवीत यश मिळवले. स्वत: लोकसभेत सलग दोनदा प्रतिनिधित्व केले. अधिकाऱ्यासोबतच वाडीवस्तीवरील कार्यकर्त्याशी त्यांचा संवाद बेधडक असे.

तात्यांनी राजकारणात तरुणांना संधी दिली. मुलांच्या वयाएवढ्या कार्यकर्त्याबरोबर त्यांचा सुसंवाद असायचा. निष्ठावान कार्यकर्त्यांची फौज हिच तात्यांची खरी श्रीमंती होती. कार्यकर्त्यांसाठी घराचे दरवाजे २४ तास उघडे. कार्यकर्ता किमान चहा घेऊनच परतायचा. त्यांचा परिवार राजकारणाला वाहिलेला. तात्यांच्या संसदीय राजकारणाचा वारसा मकरंद आबा चालवत आहेत. नितीन काका जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळत आहेत आणि थोरले पुत्र मिलिंद त्यांना मार्गदर्शकाच्या भूमिकेत आहेत. तात्यांचा सहकारात हातखंडा होता. त्यांनी साखर कारखाना, जिल्हा बँक, जिल्हा परिषदेत अनेक तरुणांना रोजगार दिला.

छत्रपती संभाजी महाराज पतसंस्थेची शासकीय पातळीवरील कामे मार्गी लावली, अडचणी सोडवल्या, संचालक मंडळाला सतत मार्गदर्शन केले. तात्यांच्या आधाररुपी पंखांनी संस्थेने उत्तुंग भरारी घेत आज एक हजार कोटींचा पल्ला गाठला आहे. त्यांच्या आठवणी आमच्या पतसंस्थेच्या पारदर्शक कामकाजाला आणि समाजाभिमुख कार्याला सदैव प्रेरणा देत राहतील. त्यांनी घालून दिलेली शिकवण हिच आमच्यासाठी आयुष्याभराची शिदोरी आहे. त्यांच्या पश्चात त्यांच्या तिन्ही मुलांनी संस्थेला साथ दिली आहे. सध्याच्या राजकारणाला तात्यांच्या कणखर विचारांची आणि परखड आचरणाची गरज वाटते. अशा या सर्वसामान्यांच्या तत्वनिष्ठ नेत्याला विनम्र अभिवादन.

# दोघे एकमेकांच्या विरोधात नसतील तर उदयनराजे पृथ्वीराज चव्हाण यांच्यासाठी लोकसभा सोपी

**सातारा :** सरपंच पद, पंचायत समिती सदस्य किंवा जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडणूक लढवणे ही राजकारण प्रवेशाची पहिली पायरी समजली जाते. व्यक्ती शहरातील असेल तर नगरसेवक होणे ही राजकारणाची सुरुवात असते. तसेच अंतिम ध्येय आमदार होणे व मंत्रीपद मिळण्यासाठी खटपटी करणे असते. थेट आमदारकीला गवसणी घालण्यासाठी त्या व्यक्तीला एकतर राजकीय घराण्याची पार्श्वभूमी असणे आवश्यक ठरते किंवा वजनदार पक्षाचा पाठिंबा मिळवणे जरुरीचे ठरते. थेट लोकसभा निवडणूक लढवणे कोणालाच आवडत नाही. दिल्लीच्या गर्दीत आपल्याला किंमत असणार नाही, आपण हरवून जाऊ, असे त्यांना वाटणे साहजिकच आहे. आपली माणसे दिल्लीत बावरतात.

अपवाद पृथ्वीराज चव्हाण व उदयनराजे यांचा. आमदारकी मिळवून सातारा, कराड मधून खासदारकी लढवलेले अनेक जण आहेत. पृथ्वीराज चव्हाण, उदयनराजे भोसले सोडले तर खासदारकीचे आकर्षण कोणालाच नव्हते. लक्ष्मणराव पाटील, प्रतापराव भोसले, अभयसिंहराजे भोसले निवडणूक सोपी असूनही खासदार होण्यास उत्सुक नव्हते. त्यामुळे तिघेही आपापल्या मुलांची आमदारकी पक्की करण्याच्या अटी घालूनच ते खासदार झाले. दुर्दैव असे की या तिघांनी आपली मुले अनुक्रमे मकरंद पाटील, मदन भोसले, शिवेंद्रराजे भोसले यांना आमदार करण्याच्या अटी पक्षश्रेष्ठींकडून मान्य करून घेतल्या व त्यावेळी हे तिघेही तिकिटे मिळूनही पराभूत झाले. पृथ्वीराज चव्हाण यांची काँग्रेस पक्षात चांगली उठबस होती. दिल्लीत त्यांचे वजन होते. आनंदराव चव्हाण, प्रेमलाताई चव्हाण खासदार होते. त्यामुळे चव्हाण घराण्याला दिल्लीची परंपरा होती. पृथ्वीराज चव्हाण तसे महाराष्ट्रात काम करण्यास नाखुशच होते. परंतु मुख्यमंत्री पदाची जबाबदारी पडल्यावर त्यांनी ती स्वीकारली. उदयनराजेंनी आमदारकीचा प्रयत्न केला एकदा ते निवडूनही आले, परंतु त्यांना दिल्लीचे जास्त आकर्षण होते. सध्या २०२४ च्या लोकसभा निवडणुकीसाठी पृथ्वीराज चव्हाण काँग्रेसकडून किंवा महाविकास आघाडीकडून इच्छुक आहेत. त्यांनी तशी तयारीपण चालवलीय. महाविकास आघाडीकडे श्रीनिवास पाटील यांचा पर्याय असला तरी त्यांचे वय लक्षात घेता सारंग पाटील यांचा विचार होऊ शकतो. राष्ट्रवादी पक्षाच्या ताकदीवर गतवेळी श्रीनिवास पाटील विजयी झाले. पक्षाचे संघटन कामी आले. याउलट उदयनराजे भोसले यांचे झाले व त्यांना पराभव सामोरे जावे लागले. आता परिस्थिती पूर्ण बदललीय. राष्ट्रवादीतील फुटीमुळे ती विभागली गेली आहे. सातारा लोकसभा अंतर्गत शरद पवार गटाचा फक्त कराड उत्तर मध्ये आमदार आहे. दक्षिण कराड काँग्रेसकडे आहे. म्हणजेच महाविकास आघाडीकडे सहापैकी दोन आमदार आहेत. पाटण,कोरेगाव येथे शिवसेना शिंदे गटाचे दोन, सातारा,जावलीत भाजपचे एक असे तीन व वाई खंडाळा अजित पवार गटाचा एक असे चार आमदार महायुतीकडे आहेत. म्हणजेच महायुतीच्या पारड्यात चार तर महाविकास आघाडीच्या पारड्यात दोन विधानसभा मतदारसंघ येतात. वरवर हे चित्र पाहिले तर कागदावर गणिते मांडणारे महाविकास आघाडीचा उमेदवार विजयी होईल, हे छातीठोकपणे सांगतील, पण बदलत्या राजकारणातील इकडून तिकडे मारलेल्या उड्या लोकांच्या पचनी पडतील असे वाटत नाही. हा प्रयोग उदयनराजे भोसले यांनी गेल्यावेळी केला, त्याचे उदाहरण आपल्यासमोर आहे. मतदारांच्या मनात घाणेरड्या राजकीय उलथापालतथीमुळे खतखद निर्माण झाली आहे. सध्या उदयनराजे भोसले हे राज्यसभा खासदार आहेत, अजून त्यांचा दोन अडीच वर्षाचा कार्यकाळ बाकी आहे. असे असताना कागदी गणितावर अवलंबून मैदानात उतरणे त्यांच्यासाठी जखमीचे ठरू शकते. समोर पृथ्वीराज चव्हाण यांच्यासारखा चेहरा जर महाविकास आघाडीने दिला तर विधानसभेची गणिते बिघडू शकतात. पक्षांना किंवा आमदारांना मानणारे ठराविक मतदार असले तरी पृथ्वीराज चव्हाण यांची सातारा जिल्ह्यात एक वेगळी प्रतिमा आहे. उदयनराजे व चव्हाण हे मैदानात उतरले तर लढत लक्षवेधी होईल. भाजप पक्षश्रेष्ठींकडे दुसरा पर्यायी तगडा उमेदवार नाही. उदयनराजे लोकसभेसाठी उतरले नाहीत तर पृथ्वीराज चव्हाण यांच्यासाठी ही निवडणूक सोपी असेल. तर पृथ्वीराज चव्हाण नसतील तर ही निवडणूक उदयनराजेंसाठी सोपी असेल. फक्त दुसऱ्या मतदारसंघातून येऊन जयकुमार गोरे यांच्यासारख्या वटवटी आमदारांच्या तोंडाला त्यांनी लगाम घालायला हवा. कारण नसताना स्वतःचे महत्त्व वाढवणारी त्यांची कराडातील उलटसुलट विधाने उदयनराजेंसाठी अडचणीची ठरू शकतात. कराड दक्षिणेत पृथ्वीराज चव्हाण हे आमदार आहेत. ते जर लोकसभेला गेले तर अतुल भोसले यांचा विधानसभेचा मार्ग मोकळा होऊ शकतो. त्यामुळे अतुल भोसले आपला सगळा लवाजमा त्यांच्यासाठी राबवतील हे निश्चित. त्यांना स्वतःची फिकीर असेल. उदयनराजे यांची नव्हे. आमदार होण्यासाठी पक्षाची तर ते मुळीच फिकीर करणार नाहीत. उदयसिंह पाटील हे त्यांच्यासाठी विधानसभेत आव्हान ठरू शकत नाहीत, असे त्यांना वाटते. उत्तरेत भाजपवाले एक झाले असले तरी शरद पवार राष्ट्रवादीला मानणाऱ्या बाळासाहेब पाटलांची ताकद चांगली आहे. लोकसभेतील उमेदवारावर कराड व पाटणचे गणित ठरते. सातारा,जावली मध्ये राजे मंडळींशिवाय कोणाचेच काही चालत नाही. इथे भाजपची आघाडी असेल. कोरेगावात शशिकांत शिंदे पराभूत होण्याच्या आधीपासून महेश शिंदेंनी गड पोखरलाय. त्यांना राजेमंडळीची साथ मिळत आहे. वाई, खंडाळा, महाबळेश्वर येथे मकरंद पाटील यांचची ताकद आहे. तिथे आता भाजप विरोधी फारसे राहिले नाहीत. विराज शिंदे हा एकमेव विरोधी चेहरा आहे. या एवढ्या ताकतीवर लोकसभेची जागा मागण्याचे धाडस अजित पवार करणार नाहीत आणि कराड उत्तरच्या जोरावर श्रीनिवास पाटील किंवा सारंग पाटील यांना जागा सोडा म्हणण्याचचे धाडस शरद पवार करणार नाहीत. म्हणजेच महायुती व महाविकास आघाडीचे दोनच नावावर एकमत होऊ शकते, ते म्हणजे उदयनराजे भोसले व पृथ्वीराज चव्हाण. ही लढत महाराष्ट्रातील एकमेव लक्षवेधी लढत असेल व लोकसभा निवडणुकीत रंगत येईल.

**शिवाजी काळभोर**
**सातारा**
**९७६४३१८०४०**

मुख्य *संपादक : नरेश विठ्ठल देसाई हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.



# कु.साक्षी इळगेर हिची भारतीय सैन्य दलात अग्निवीर म्हणुन निवड

**जत :** राजे रामराव महाविद्यालय,जत येथिल राष्ट्रीय छात्र सेना, शारीरिक शिक्षण व इंग्रजी विभागाची विद्यार्थिनी कु.साक्षी सतिश इळगेर हिची भारतीय सैन्य दलात अग्निवीर म्हणुन निवड झाली आहे. तिच्या ह्या निवडीबद्दल राजे रामराव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुरेश पाटील यांनी तिचा सत्कार करुन अभिनंदन केले.

कु.साक्षी ही मूळची नागज, ता. कवठेमहांकाळ, येथील असून तिच्या लहानपणीच आई-वडीलांचे निधन झाले आहे. अनाथ झाल्याने जत येथील भगिनी निवेदिता मुलींचे बालग्रह या ठिकाणी तिचे संगोपन व १२ वी पर्यंतचे शिक्षण झाले. सध्या ती मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, जत येथे राहते. कु.साक्षी ही राजे रामराव महाविद्यालयात बी.ए भाग दोनमध्ये शिकत आहे. शिक्षण घेत असतानाच ती महाविद्यालयातील विविध स्पर्धा, खेळ, राष्ट्रीय छात्र सेना इत्यादी मध्ये सहभाग नोंदवत होती. अथक प्रयत्न व प्रामाणिक कष्ट यामुळेच तीची भारतीय सैन्यात अग्निवीर म्हणून भरती झाली आहे. विद्यार्थ्यांमध्ये जिद्द आणि मेहनत करण्याची तयारी असेल तर यश मिळते असे उद् गार राजे रामराव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुरेश पाटील यांनी व्यक्त केले.

कु.साक्षीने सुरुवातीला भरती परीक्षा दिली. त्यानंतर घेण्यात आलेल्या शारीरिक चाचणीत ती उत्तीर्ण झाली. त्यानंतर कागदपत्र पडताळणीची प्रक्रिया व मेडिकल झाले. या सर्व टप्प्यातील कामगिरी पाहून अंतिम गुणवत्ता यादी तयार केली गेली, आणि त्यानुसार तिची अग्निवीर जनरल ड्युटीसाठी निवड झाली आहे. पुणे विभागातून एकुण चार विद्यार्थ्यांनीची निवड झाली असून त्यापैकी कु.साक्षी हिची अव्वलस्थानी निवड झाली आहे. तिच्या या यशाबद्दल १६ महाराष्ट्र बटालियन सांगलीचे कमांडिंग ऑफिसर कर्नल चंद्रशेखर साठे, डम ऑफिसर कर्नल अभिजीत बर्वे, कॅप्टन प्रा.पांडूरंग सावंत, सुभेदार मेजर सर्जेराव जाधव व सर्व पीआय स्टाफ तसेच राजे रामराव महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंदानी व विद्यार्थी विद्यार्थीनींनी तिचे अभिनंदन करुन भावी कामगिरीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

### एकल महिलांच्या सन्मानासाठी 'अभया' संबोधावे

# 'वंचित विकास'कडून उपमुख्यमंत्री अजित पवार यांना आवाहन; शासन आदेश काढण्याची मागणी

**पुणे :** समाजातील एकल महिलांना विधवा, परित्यक्ता, घटस्फोटित, बिन लग्नाची, वांझ, एकटी बाई, नवऱ्याने सोडलेली, नवरा सोडलेली असे अपमानास्पद शब्द वापरू नयेत. तसेच या एकल महिलांच्या सन्मानासाठी 'अभया' या शब्दाने संबोधावे, असे आवाहन वंचित विकास संस्थेच्या शिष्टमंडळाने मा. उपमुख्यमंत्री अजित पवार यांना केले. या संदर्भात सरकारने शासन आदेश काढण्याची मागणीही त्यांनी यावेळी केली. अजित पवार यांनी या मागणीचा सकारात्मक विचार करून लवकरच निर्णय घेण्याचे आश्वासन वंचित विकास संस्थेला दिले.

संस्थेच्या कार्यवाह व संचालक मीना कुर्लेकर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने शनिवारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची पुण्यातील नवीन विश्रामगृहात भेट घेऊन निवेदन दिले. वंचित विकास संस्थेच्या संचालक सुनीता जोगळेकर, सहकार्यवाह देवयानी गोंगले,



सदस्य मीनाक्षी नवले, चैत्राली वाघ, डॉ. श्रीकांत गबाले, तेजस्विनी थिटे यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते योगेश गोगावलेही उपस्थित होते.

मीना कुर्लेकर म्हणाल्या, वंचित विकास संस्था गेली ३७ वर्षे समाजातील विविध वंचित घटकांच्या प्रगतीसाठी काम करत आहे. महिलांसाठी काम करत असताना असे जाणवले की, 'महिलांना उद्देशून आपण अनेक अपमानास्पद शब्द वापरतो; मात्र, त्या शब्दांचा त्या महिलांच्या मनावर आघात होत असतो.' ही बाब लक्षात आल्यावर आम्ही सन्मान देणारा योग्य शब्द वापरण्याबाबत विचार केला. तेव्हा 'अभया' हा शब्द सर्वानुमते पुढे आला. अभया म्हणजे परिस्थितीला न घाबरता सक्षमपणे तोंड देणारी महिला होय.

या महिलांचा सन्मान करणाऱ्या विचाराला राज्यभरातून मान्यता देणाऱ्या हजारो स्वाक्षऱ्या, लेखी पत्रे आली आहेत. हे अभियान मागील दहा वर्षापासून सातत्याने सुरु असून, समाजातील विविध मान्यवरांना भेटून याची जनजागृती करत आहोत. मा. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनाही सदर निवेदन पाठवले असून, त्यांचा सकारात्मक प्रतिसाद आलेला आहे. आजवर एकल महिलांना सन्मानाने संबोधण्यासाठी कोणीही विचार केलेला नव्हता. शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारसरणीचे हे सरकार असून, धडाडीने निर्णय घेणाऱ्या पुरोगामी विचारांचे मा. मुख्यमंत्री अजित पवार यांनी हा निर्णय तातडीने घ्यावा आणि त्याची अंमलबजावणी करावी, ही आमची विनंती आहे, असे मीना कुर्लेकर यांनी नमूद केले.

**महाराष्ट्र अनेक उपक्रमांचे प्रेरणास्रोत असल्याचा इतिहास आहे. एकल महिलांना सन्मान देण्यासाठी 'अभया'ची सुरुवात महाराष्ट्रातून झाली आहे.'अभया' संबोधण्याबाबत राज्य शासनाने आदेश काढला, तर हे एक क्रांतिकारी पाऊल असेल. तसेच भविष्यात मा. राष्ट्रपती मुर्मू यांनी देशपातळीवर 'अभया' संबोधन लागू केल्यास, त्याची सुरुवात महाराष्ट्राने केल्याची नोंद होईल. असे झाल्यास 'अभया' उपक्रमासाठी देशात महाराष्ट्र राज्य आदर्श व अग्रेसर ठरेल, असा विश्वासही मीना कुर्लेकर यांनी व्यक्त केला.**

# शेवटी ४० वर्षांनंतर शरद पवार..., याचं क्रेडिट अजित पवारांनाच

## फडणविसांची बोचरी टीका

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर निवडणूक आयोगाने नुकतेच शरद पवारगटाला नवे नाव आणि चिन्ह बहाल केले आहे.शरद पवारगटाला 'राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार' असे नाव आणि 'तुतारी वाजवणारा माणूस' हे चिन्ह मिळाले आहे. यानंतर शनिवारी, या चिन्हाचे किल्लेरायगडावरअनावरण करण्यात आले. यावेळी शरद पवारही उपस्थित होते. यासंदर्भात बोलताना भाजप नेते तथा उपमुख्यमंत्रीदेवेंद्र फडणवीसयानी खासदार शरद पवार यांना टोला लगावला आहे. शेवटी ४० वर्षांनंतर शरद पवाररायगडावरगेले. याचे श्रेय अजितदादांनाच द्यावे लागेल, असे फडणवीस यांनी म्हटले आहे. ते पुण्यात प्रत्रकारांसोबत बोलत होते.काय म्हणाले फडणवीस? -



उपमुख्यमंत्रीदेवेंद्र फडणवीसम्हणाले, मला एकाच गोष्टीचा आनंद आहे की, ४० वर्षांनंतर पवार साहेब शेवटी रायगडावर गेले. अजितदादांना एका गोष्टीचं क्रेडिट तर द्यावं लागेल. अजितदादांमुळे शेवटी ४० वर्षांनंतर पवार साहेबांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरणी जावं लागलं. आता तुतारी कुठे वाजते, कशी वाजते, किती वाजते हे आपल्याला भविष्यात दिसेलच, असे ते म्हणाले.

### चंद्रकांत पाटलांनीही काढला चिमटा -

**तत्पूर्वी, रायगडावर लोकसभेपूर्वी तुतारी वाजतेय... वाजेल का...?' असा प्रश्न सोलापूर येथे एका पत्रकाराने पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांना केला असता ते म्हणाले, तुताऱ्या वाजवा नाही तर मशाली पेटवा, पण शेवटी महाराष्ट्रात आतापर्यंत आम्ही ४५ म्हणत होतो, पण आता क्रॉस करू असं दिसायला लागलं आहे. एवढेच नाही तर, विरोधी पक्षाने शेवटपर्यंत हार मानायचीच नसते ना. सारखं म्हणायचंच असतं, शरद परावांनी असं म्हणायचंच असतं की, माझे २०-२२ येणार आहेत. नशीब ते २०-२२ तरी देतायत इकडे. पण त्यांना हे कळून चुकले आहे की ४५ वैगेरे काही नाही, बहुतेक ४८ पर्यंत गाडी जाईल, असा चिमटाही पाटील यांनी शरद पवारांना काढला.**

# संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांनी केली शाळा परिसराची स्वच्छता

**हडपसर :** संत गाडगे महाराज जयंती निमित्त उंड्रीतील भिंताडेनगर , शाळा, कॉलेज परिसरातील कचरा सफाई करण्यात आली . पुणे महापालिका घनकचरा व्यवस्थापन व भिंताडेनगर आरोग्यकोठी यांच्या सहकार्याने हिल ग्रीन, बीशप शाळा व कॉलेज मधली विद्यार्थी, ग्रामस्थ यांनी मुख्यमंत्री स्पर्धा 'स्वच्छ माझी शाळा' या अंतर्गत सर्व भागात कचरा साफ करुन परिसर स्वच्छ केला.

यावेळी पुणे वेस्ट वरियसचे परवीन तांबे, सुजाता बाणखेले, अनामिका रॉय, मोही शर्मा, सामाजिक कार्यकर्ते राजेन्द्र भिंताडे, दादा कड, लालचंद भिताडे विठ्ठल भिंताडे, निलेश भिंताडे, तुषार भिंताडे, राम उमाप व वरिष्ठ आरोग्य निरीक्षक मंगलदास माने, आरोग्य निरीक्षक उमेश ठोंबरे, अमर शेरे, मुकादम दयानंद पाटोळे, विद्यार्थी तसेच मनपा सेवक उपस्थित होते.



# पोलिसांना मोठा दिलासा;

## अर्जित रजा रोखीकरणाच्या सवलतीचा निर्णय पुन्हा जारी

**मुंबई :** महाराष्ट्रातील पोलिस शिपाई ते पोलिस निरीक्षकांपर्यंत १५ दिवसांच्या अतिरिक्त अर्जित रजा रोखीकरणाची सवलत रद्द करण्याचा निर्णय राज्य सरकारने दोन दिवसांपूर्वी घेतला होता. या निर्णयामुळे राज्याच्या पोलिस दलातून नाराजी व्यक्त करण्यात आली होती. तसेच पोलिसांच्या रजा रोखीकरण सवलती रद्द करण्याचा निर्णय चुकीचा असल्याचं मत अनेकांनी व्यक्त केलं होतं.

यानंतर अखेर राज्य सरकारने हा निर्णय रद्द करत पोलिस दलातील अर्जित रजा रोखीकरणाच्या सवलतीचा निर्णय पुन्हा जारी केला आहे. त्यामुळे राज्यातील पोलिसांना मोठा दिलासा मिळाला आहे. राज्यातील पोलिसांना १५ दिवसांची अतिरिक्त अर्जित रजा रोखीकरणाची सवलत दिली जात होती. मात्र, २१ फेब्रुवारीला राज्य सरकारने निर्णय जारी करत ही सवलत रद्द करण्याचा निर्णय घेतला. मात्र, या निर्णयामुळे पोलिस दलातील अनेकांनी नाराजी व्यक्त केली.

सरकारने घेतलेल्या या निर्णयानंतर पोलिस बॉइज संघटनेकडून ही सवलत कायम ठेवण्यासाठी राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र देण्यात आले होते. या पत्राच्या माध्यमातून पोलिसांना १५ दिवसांची अतिरिक्त अर्जित रजा रोखीकरणाची सवलत पुन्हा देण्याची विनंती करण्यात आली होती.

अखेर पोलिसांच्या भावना लक्षात घेऊन राज्य सरकारने हा शासन निर्णय रद्द करत पोलिसांना अर्जित रजा रोखीकरणाची सवलत कायम ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. दरम्यान, पोलिस दलातील अर्जित रजा रोखीकरणाच्या सवलतीचा निर्णय पुन्हा जारी करण्यात आल्यामुळे पोलिसांना दिलासा मिळणार आहे.

पोलिस अधिकाऱ्यांच्या मिरवणुका, पुष्पवृष्टीवर बंधनं

पोलिस दलातील बदली झालेल्या पोलिस अधिकारी यांच्या सन्मानार्थ विविध पोलिस ठाणे किंवा शाखांमध्ये निरोप समारंभ आयोजित केले जातात.

पोलिस अधिकाऱ्यांच्या बदलीनंतर निरोप समारंभाचा कार्यक्रम करत त्यांना फेटे बांधून जीपमधून त्यांची मिरवणूक अनेकदा काढली जात होती. मात्र, यापुढे आता या गोष्टी करता येणार नाहीत. याबाबत राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी एक परिपत्रक जारी करत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे यापुढे पोलिस अधिकाऱ्यांच्या मिरवणुका, फेटे बांधणे, पुष्पवृष्टी करणे, अशा गोष्टींवर बंधने येणार आहेत.

## विठ्ठल रुक्मिणी भंजनी मंडळाचा भजन महोत्सव स्पर्धेत अव्वल

**सातारा :** श्रीकृष्ण वेण्णा उत्सव संगम माहुली येथे नुकत्याच पार पडलेल्या भंजनी स्पर्धेत विठ्ठल रुक्मिणी भजनी मंडळ राऊतवाडी खोलवडी यांनी प्रथम क्रमांक पटकावला आहे.

यामध्ये गायक शिवाजी कदम,तबलावादक अजय गायकवाड,कोरससाथ शशिकांत माने,मोहन भिलारे व बाळासाहेब चाफेकर हे कलावंत उपस्थित होते.या मंडळाने आता पर्यंत भरपूर ठिकाणी भजन स्पर्धेत भाग घेऊन प्रथम क्रमांक पटकाविला आहे.भजन परंपरेच्या माध्यमातून सुसंस्कार व संस्कृती रुजावी.अध्यात्मिक संगीत परंपरा इतरांना ज्ञात व्हावी. म्हणून हा भजन महोत्सव भरविण्यात आला होता.

# आता एकच लक्ष्य; राज्यसभा सदस्य

## उदयनराजेंनी स्पष्टच सांगितलं...

**सातारा :** खासदार उदयनराजे भोसले यांनी आज वाढदिवसाच्या निमित्ताने भवानी मातेचं दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले. आणि आजपासून खऱ्या अर्थानं त्यांच्या लोकसभेच्या प्रचाराला सुरुवात झाली. त्यावर त्यांनी त्यांची भूमिकाही स्पष्ट केली.

प्रत्येकाच्या मनात इच्छा असते. त्यात गैर काहीही नाही. मलाही वाटतं की, आपण लोकांच्या माध्यमातून 'त्या' सभागृहात जावे, असे उदयनराजे यांनी स्पष्टपणे सांगितले.



खासदार उदयनराजे भोसले यांच्या वाढदिवसानिमित्त जलमंदिर पॅलेसमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. या वेळी भवानी मातेचे दर्शन घेतल्यानंतर राजमाता कल्पनाराजे भोसले यांनी त्यांचे औक्षण केले. या वेळी पत्नी दमयंतीराजे भोसले उपस्थित होत्या. यानंतर उदयनराजेंनी माध्यमांशी मुक्तपणे संवाद साधला.

संकल्प केवळ वाढदिवसापुरता मर्यादित नसतो. मी सर्वसामान्य माणसाला समोर ठेवून वाटचाल केली आहे. कधीही राजकारण केलं नाही. फक्त जनतेच्या हितासाठी समाजकारणच केलं, असा दावा या वेळी खासदार उदयनराजे यांनी केला.

छत्रपती शिवाजी महाराजांची कल्पना, सर्वधर्म समभावाच्या विचारानं मी वाटचाल केली आहे. कधीही जातीधर्मात भेदभाव केला नाही. देश अखंड ठेवायचा असेल तर प्रत्येकाची जबाबदारी आहे. आपण बंधुत्वाच्या भावनेतून राहणे गरजेचं आहे. नाहीतर युनायटेड स्टेटस ऑफ अमेरिका आहे, तसेच आपल्याकडे होऊ नये, याची काळजी आपण सर्वांनी घेतली पाहिजे, असं आवाहन त्यांनी या वेळी केलं.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शुभेच्छा देण्यासाठी जलमंदिर पॅलेसमध्ये आले होते. ते काय घोषणा करतील का, यावर उदयनराजे म्हणाले, मुख्यमंत्री काय घोषणा करतील मला माहीत नाही. पण येथे येतात हे त्यांचं मोठेपण आहे. आमचे त्यांच्याशी वैयक्तिक संबंध आहेत. आता जरी ते मुख्यमंत्री असले तरी आमदार असल्यापासूनचे आमचे संबंध आहेत. महाबळेश्वरला नाट्यपरिषद होत आहे, त्यामुळे ते येत होते, त्यांना आम्ही भेट घेण्याची विनंती केली. त्यानुसार ते आले, असे त्यांनी सांगितले.

वाढदिवसाच्या निमित्ताने सातारा लोकसभा निवडणुकीच्या मोहिमेस सुरुवात झाली असे म्हणता येईल का? यावर उदयनराजे म्हणाले, मोहीम सुरू झाली म्हणता येईल. निवडणूक लढावी ही प्रत्येकाच्या मनात इच्छा असते. त्यात गैर काहीही नाही. वाटतं की आपण लोकांच्या माध्यमातून त्या सभागृहात जावे, असं सांगत लोकसभेत जाण्याची इच्छा व्यक्त केली.

# भाजपचे एका दगडात दोन पक्षी : देवरा राज्यसभेत, नार्वेकर लोकसभा मैदानात!

**मुंबई :** भाजपने लोकसभा निवडणुकीची किती जोरदार तयारी केलीय ती आता उमेदवार जाहीर करताना दिसून येत असून, दक्षिण मुंबईतून विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना मैदानात उतरवण्याचे आदेश पक्षाने दिले आहेत. या आदेशाने भाजपने एका दगडात दोन पक्षी मारले आहेत. काँग्रेसचे नेते मिलिंद देवरा यांना आधी शिवसेनेत घेण्यास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भाग पाडले आणि त्यांना शिवसेनेच्या कोट्यातून राज्यसभेवर पाठवले. आता राहुल नार्वेकर यांना लोकसभेसाठी उतरवत देवरा यांच्या मदतीने भाजपकडे जागा खेचून आणण्याचा प्रयत्न आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभेत ३७० जागा जिंकण्याचे लक्ष्य ठेवले असून, यासाठी त्यांनी एकूण ५४३ जागांवर आपली काय ताकद आहे, याचा गेले दोन एक वर्षे बारीक अभ्यास केला आहे. विशेष म्हणजे



लोकसभा मिशन ३७० सुद्धा निश्चित करताना या जागा हमखास जिंकणार, असा त्यांचा ग्राउंड रिपोर्ट तयार असल्याचे समजते. यात दक्षिण मुंबईची जागा येते. देवरा यांनी काँग्रेस सोडण्याची तयारी केल्यानंतर उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या मदतीने भाजपचे गृहमंत्री अमित शाह यांच्याशी त्यांची भेट झाल्याचे कळते.

या भेटीत दक्षिण मुंबईची तयारी झाली. तुम्ही आमचेच, पण भाजपमध्ये थेट यायचे नाही, जायचे शिंदे शिवसेनेत. तुमची राज्यसभा पक्की. यानिमित्ताने दाखवायला तुम्ही शिवसेनेचे. यामुळे शिंदे सेनेला मानणारा मतदार भाजपला मतदान करेल, वर भाजपची मते नार्वेकर यांना पक्की असतील.

मिशन लोकसभा ३७० चे गणित अशा या डावपेचात आहेत. मागच्या दोन लोकसभा निवडणुकीत जिंकलेल्या उद्धव ठाकरे शिवसेनेच्या अरविंद सावंत यांना पराभूत करण्यासाठी भाजपची ही रणनीती किती यशस्वी होते, हे आता संमिश्र लोकवस्तीचे मतदार ठरवणार आहेत. एक मात्र तितकेच खरे आहे, की देवरा जरी शिंदे शिवसेनेकडे गेले असले तरी त्यांच्या मागोमाग काँग्रेसला मानणारा वर्ग हललेला नाही. विशेष म्हणजे दक्षिण मुंबई मतदारसंघाचा कानोसा घेतला असता मुस्लिम मतदार मोठ्या संख्येने उद्धव ठाकरे यांच्याकडे आकर्षित झाले आहेत. यामुळे भाजपला वाटते तितकी ही लढत सोपी नाही.

राहुल नार्वेकर यांच्याकडून लोकसभा मतदारसंघाची बांधणी सुरू झाली असून, नार्वेकर हे आजपासून प्रचाराला सुरुवात करणार आहेत. महत्त्वाचं म्हणजे राहुल नार्वेकर हे लोकसभा निवडणुकीचा नारळ आदित्य ठाकरेंच्या बालेकिल्ल्यात फोडणार आहेत.नार्वेकर यांचा वरळी विधानसभेत दोनदिवसीय वार्डनिहाय दौरा नियोजित आहे. ते वरळीत शनिवारी सकाळी ११ वाजता वॉर्ड क्रमांक १९३ ला भेट देणार आहेत. त्यानंतर सकाळी ११:४० वाजता वॉर्ड क्रमांक १९६ कार्यालयास भेट देणार आहेत. दुपारी १२:२० वाजता वॉर्ड क्रमांक १९५ला नार्वेकर यांची भेट असेल. याशिवाय विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर (ठर्हीश्र छ्रीुशज्ञरी) स्थानिक नागरिकांसोबत चर्चा करणार आहेत. त्यानंतर वॉर्डातील भाजपच्या प्रमुख पदाधिकार्‍यांसोबत संवाद साधतील.

भाजपने या लोकसभा मतदारसंघात विशेष लक्ष देताना अंतर्गत मोर्चेबांधणी सुरू केली आहे.

सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे या लोकसभा मतदारसंघातील ठाकरे गटाकडे असलेल्या वरळी आणि शिवडी विधानसभा मतदारसंघाकडे भाजपने विशेष भर दिला आहे. ठाकरे गटाची मते वळवण्यासाठी भाजपने मराठीचा मुद्दा घेऊन चालणाऱ्या राज ठाकरेंच्या

मनसेची साथ घेतली तर नवल वाटायला नको. त्यातच भाजप मनसे

युतीच्या चर्चांनादेखील काही दिवसांपूर्वी सुरुवात झाली होती.

मनसेच्या साथीने मराठी मते स्वतःकडे वळवण्यास भाजपला मदत होईल. माझगाव, शिवडी, लालबाग परळ या ठिकाणी मनसेची असलेली ताकद जमेची बाजू आहे. बाळा नांदगावकर (इरश्रर छ्रपरपवसर्रींज्ञरी) यांचा मराठी भागात असलेला प्रभाव याचीही भाजपला मदत होऊ शकते.

# कोल्हापुरातील अंबाबाई मंदिर विकासासाठी ४० कोटींचा निधी

**कोल्हापूर :** करवीरनिवासिनी अंबाबाई मंदिर परिसर तीर्थक्षेत्र विकासासाठी नगरविकास विभागाने ४० कोटींचा निधी मंजूर केला असून, शुक्रवारी शासन निर्णयअंतर्गत याचा अध्यादेश काढण्यात आला आहे. या निर्णयामुळे अंबाबाई मंदिराच्या परिसर विकासाला चालना मिळणार आहे. अंबाबाई मंदिर विकास कॉरिडॉरसाठीच्या १४०० कोटींचा आराखड्याचा हा पहिला टप्पा असेल.



अंबाबाई मंदिर विकास आराखड्याच्या पहिल्या टप्प्यातील ८० कोटींच्या विकासकामांना २०१९ साली मंजुरी देण्यात आली होती. त्यांपैकी आलेल्या १० कोटी ७० लाखांच्या निधीत बहुमजली पार्किंगचे काम करण्यात येत आहे. प्रथम टप्प्यात मंजूर केलेल्या निधीपैकी चालू आर्थिक वर्षात ६९.२६ कोटींच्या मागणीचा प्रस्ताव नियोजन व वित्त विभागाला सादर करण्यात आला होता. त्यानुसार सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या पूरक मागणीद्वारे सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशीर्षाखाली ४० कोटी इतका निधी उपलब्ध करुन दिला असून, निधी वितरित करण्यास नियोजन व वित्त विभागाने मंजुरी दिली आहे.

अंबाबाई मंदिर तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी चालू वित्तीय वर्षाच्या मंजूर अनुदानातून रु. ४० कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्यात येत असून, उपलब्ध करून दिलेल्या निधीपेक्षा जास्तीचे दायित्व घेण्यात येऊ नये, असे अध्यादेशात म्हटले आहे.

**पावनखिंडसाठी १५ कोटी**

**स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव योजनेंतर्गत पावनखिंड येथे शासकीय विश्रामगृह बांधण्यासाठी १४ कोटी ९५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.**

# जुन्या कोयना पुलाच्या खालील नदीपात्रात

**कराड :** येथील जुन्या कोयना पुलाखालील नदीपात्रात सुमारे ३५ ते ४० वर्षीय पुरूषाचा मृतदेह काल सायंकाळी आढळला. मृतदेहाच्या गळ्यावर वार केल्यासारख्या खुना असुन त्याला पाईपला बांधुन नदीपात्रात टाकल्याचे तपासात दिसुन आले आहे. त्याचा विचार करुन हा खुन असावा असा अंदाज बांधुन पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली आहेत. तपासासाठी चार पोलिस पथके रवाना करण्यात आल्याची माहिती वरिष्ठ शहर पोलिस निरीक्षक के. एन. पाटील यांनी आज दिली.

पोलिसांची माहिती अशी : कोयना धरणातून पाणी सोडल्याने नदीपात्रात पाणी जास्त होते. काल नदीपात्रातील पाणी कमी झाल्यावर येथील जुन्या कोयना पुलाच्या खालील नदीपात्रात एका पुरूषाचा मृतदेह वाहनधारकांना दिसला. त्यामुळे पुलावर गर्दी झाली. गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलिस उपनिरीक्षक पतंग पाटील, अर्जुन चोरगे, अमित पवार, शशिकांत काळे, कुलदीप कोळी यांच्यासह पोलीस यांनी नागरिकांच्या मदतीने मृतदेह बाहेर काढत तपास सुरू केला. मृतदेहाच्या गळ्यावर वार झाल्यासारख्या खुना दिसत आहेत. त्याचबरोबर त्याला लोखंडी पाईपला बांधुन नदीपात्रात टाकल्याचे दिसुन आले आहे. संबंधिताच्या हातावर ३/३ अशी अक्षरे लिहून गोंदलेले आहे. त्यामुळे हा खून असावा असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी बांधला आहे. त्यानुसार पोलिसांनी तपास सुरु केला आहे. तपासासाठी पोलिसांची चार पथके मुंबई परिसराताल वाशी, कळंबोली, कर्नाटकात व कोकणात रवाना करण्यात आली आहेत. लवकरच त्याचा उलगडा होईल असे पोलिसांनी सांगीतले. दरम्यान पोलिस उपाधिक्षक अमोल ठाकुर यांनी आज त्यांच्या कार्यालयात सर्व पोलिस अधिकाऱ्यांची बैठक घेवुन या तपासासंदर्भात सुचना केल्या. त्यानुसार पोलिसांनी तपास सुरु केला आहे.

# जाती व्यवस्था मुक्त समाज निर्माण करणे काळाची गरज : दिपक चव्हाण

## हडपसर मध्ये संत शिरोमणी रोहिदास महाराज जयंती कार्यक्रम

**हडपसर :** आजचे राजकारण हे जातीजातीवरुण चालले पहायला मिळते जातीयेतेची दरी वाढताना दिसत आहे. जात ही जाता जात नाही,जाती व्यवस्था मुक्त समाज करणे ही काळाची गरज आहे,जातीयेतेची चटके डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अधिक बसले , समाज , देश एकरुप ठेवण्यासाठी जातीव्यवस्था नष्ट झाली पाहिजे असे मत

जगत गुरु संत शिरोमणी रोहिदास महाराज यांची ६४७ वी जयंती हडपसर मध्ये साजरी करण्यात आली. यावेळी दिपक चव्हाण बोलत होते.कै. लक्ष्मीबाई विठ्ठल शिखरे सामाजिक संस्थेच्या वतीने संत शिरोमणी जगत गुरु श्री रोहिदास महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.



कार्यक्रमाच्या अध्यक्ष वैद्यकीय मानसशास्त्रज्ञ व समुपदेशक डॉ.भारतीताई राजगुरु यांनी संत रोहिदास यांच्य प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.या प्रसंगी प्रमुख पाहुणे महसूल विभाग संघटनेचे अध्यक्ष दीपक चव्हाण, उद्योजक संतोष आबनावे,नोबल हॉस्पिटलचे संचालक डॉ. सुरेश शिखरे, महाराष्ट्र राज्याचे सहाय्यक संचालक डॉ.सचिन खरात संस्थेचे अध्यक्ष भागूजी शिखरे, उपाध्यक्ष दिनकर तात्या सोनवणे, सचिव प्रा.सुरेश भोसले,खजिनदार भारती शिखरे,संचालक.जयश्री शिखरे,हृषिकेश शिखरे,संगीता भोसले,बाळासाहेब शिखरे,राजेश सोनवणे,राजेंद्र ढवळे,श्रीहरी गायकवाड आदी समाजबांधव उपस्थित होते.

यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या समाज बांधवांचा सत्कार करण्यात आला.यामध्ये वैद्यकीय क्षेत्रातील डॉ. स्वाती खरात,अजय सपकाळ सामाजिक क्षेत्रातील दिनकर सोनवणे,दीपक चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आला.

कै.लक्ष्मीबाई विठ्ठल शिखरे सामाजिक संस्थेचे चित्रकार आणि संस्थेचे अध्यक्ष भागूजी शिखरे यांनी काढलेले संत रोहिदास महाराज यांचे पेंटिंग चित्र भारती राजगुरु यांना भेट दिले.

# साताऱ्यात जलमंदिरात चक्क मुख्यमंत्री यांच्या बॉडीगार्डलाच अधिकाऱ्यांकडून नो एन्ट्री

**सातारा :** छत्रपती शिवाजी महाराजांचे थेट वंशज व लोकशाही मधील रयतेचे राजे श्रीमंत छत्रपती खासदार उदयनराजे भोसले यांच्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण सातारा शहरात बॅनरबाजी व जाहिरात बाजी ने डोळे दीपावून टाकलेले आहेत. दस्तूरखूद महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे आपल्या व्यस्त कार्यक्रमातूनही सातारा येथील श्री. छ. खा. उदयनराजे भोसले यांच्या जल मंदिरात आले. त्यांनी या ठिकाणी त्यांना शुभेच्छा दिल्या तसेच जलमंदिराची पाहणी करण्याचा मोह त्यांना टाळता आला नाही. परंतु, त्या ठिकाणी बंदोबस्तासाठी असलेल्या एका पोलिस अधिकाऱ्यांनी चक्क मुख्यमंत्री यांच्यात बॉडीगार्डला नो एन्ट्री केली . त्यामुळे साताऱ्यात प्रोटोकॉलचा अतिरेक होत असल्याची चर्चा सुरू झालेली आहे. सातारा शहर व जिल्ह्यातील सर्वसामान्य व्यक्तींना अडीअडचणी सोडवण्यासाठी व न्याय मागणीसाठी सातारा शहरातील एक तर आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या सुरुची बंगल्यावर व श्री छ खासदार उदयनराजे भोसले यांच्या जलमंदिर या निवासस्थानी भेट द्यावी लागते. या ठिकाणी सामान्य माणसाला सुद्धा भेट घडवून आणली जाते. त्यांचे प्रश्न मार्गी लागतात. मात्र, आज श्री छ खा उदयनराजे यांच्या वाढदिवसानिमित्त प्रोटोकॉलचा अतिरेक झाल्याचे पाहण्यास मिळाले.

ज्यांना कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी व जनतेच्या हितासाठी लगाम घालावा अशा काही व्यक्तींना काही पोलीस सलाम करत होते. तर सामान्यांना अडवले जात होते. एवढेच नव्हे तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ताफ्यातील बॉडीगार्ड (अंगरक्षक) हे सुद्धा या नो एन्ट्री पासून वाचू शकले नाहीत. एका पोलीस अधिकाऱ्यांनी चक्क बॉडीगार्ड यांनाच मुख्यमंत्री शिंदे यांच्या पाठीमागे जलमंदिर परिसरात जाण्यास मज्जाव केला. त्यांना रोखून धरले. खरं म्हणजे मुख्यमंत्री शिंदे यांच्या प्रोटोकॉल च्या नियमाप्रमाणे त्यांना कोणती इजा होऊ नये. याची संपूर्ण जबाबदारी ही बॉडीगार्ड वर असते.

एका कार्यक्रमांमध्ये एक शासकीय अधिकारी मुख्यमंत्र्यांच्या जवळ जात असताना बॉडीगार्डने त्याला समजून सांगून पाठीमागे उभे रहा असा सल्ला दिला पण त्याने तो ऐकला नाही.त्यानंतर चक्क त्याला उचलून बाजूला केले. एवढी ताकद व धमक बॉडीगार्ड कडे असताना त्या पोलिस अधिकारी कोणाच्या सांगण्यावरून प्रोटोकॉल पाळला ? याची आता चौकशी करावी. अशी मागणी होऊ लागलेली आहे.

# महाबळेश्वर येथे विभागीय नाट्यसंमेलनाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन

**महाबळेश्वर :** महाराष्ट्राला कला आणि संस्कृतीचा अत्यंत गौरवशाली वारसा लाभला आहे. कला आणि संस्कृतीशी संबंधित समस्या सोडवण्यासाठी शासन कटिबद्ध असून नाट्य संस्कृतीला अधिक बळकट करण्यासाठी राज्यात ७५ नाट्यगृहे अद्ययावत करण्यात येणार आहेत यामध्ये ५२ नाट्यगृहांचे अद्ययावतीकरण करण्यात येणार असून उर्वरित नाट्यगृहे नव्याने उभारण्यात येणार आहेत . ती सर्व सुविधा संपन्न असावीत व परिपूर्ण असावी यासाठी अकरा तज्ञांची समिती स्थापन करण्यात येणार आहे, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी बोलताना दिली.

प्रारंभी येथिल वेण्णादर्शन परिसरातून दिंडीस प्रारंभ झाला या दिंडीमध्ये मराठी सिने नाट्य सृष्टीतील प्रशांत दामले निलम शिर्के सामंत हार्दिक जोशी मेघा धाडे अक्षया देवधर संजय खापरे सविता मालपेकर दिग्गज्ज कलाकार सहभागी झाले आहे या दिंडीत शहरातील महिलांची वारी व वारकर्यांनी रंगत वाढविली या रॅलीमध्ये सर्रास कॅन्डल दिव्यांग बांधव देखिल सहभागी झाले होते ही रॅली मुख्य समारंभस्थळी पोहोचली तद्नंतर मुख्य कार्यक्रमास सुरुवात झाली



अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदचे शंभरावे विभागीय नाट्य संमेलन महाबळेश्वर येथील पोलीस परेड मैदानावरील छत्रपती शिवाजी महाराज नाट्य नगरी या ठिकाणी संपन्न होत आहे. या नाट्य संमेलनाचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले यावेळी राज्य उत्पादन शुल्क मंत्री तथा पालकमंत्री शंभूराज देसाई, आमदार मकरंद पाटील , संमेलन अध्यक्ष डॉ जब्बार पटेल, माजी संमेलन अध्यक्ष जेष्ठ अभिनेते मोहन जोशी, नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले, नरेश गडेकर, भाऊसाहेब भोईर, अजित भुरे, सतीश लोटके जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, अप्पर पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्यासह विविध दिग्गज मान्यवर, कलाकार, नाट्य परिषदेचे पदाधिकारी, रसिक व महाबळेश्वर शाखेचे अध्यक्ष डि एम बावळेकर उपाध्यक्ष संतोष शिंदे बबनराव ढेबे पालिका प्रशासक तथा मुख्याधिकारी योगेश पाटिल विलास काळे संजय दस्तुरे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते यावेळी महाबळेश्वर महोत्सव २०२४ चे देखिल उद्घाटन देखिल करण्यात आले

अनेक थोर कलाकारांच्या योगदानातून मराठी रंगभूमी बहरली. नाट्य रसिकांच्या पसंतीस उतरण्यासाठी काळानुरूप रंगभूमीने अनेक बदल स्वीकारले. त्यामुळेच व्यावसायिक सोबत प्रायोगिक रंगभूमीलाही चोखंदळ रसिकांचा उदंड प्रतिसाद लाभला आहे अनेक अडचणींवर मात करत सध्या

मराठी रंगभूमी पुढे जात आहे. अशावेळी नाट्यसंमेलनांसारखे उपक्रम महत्त्वपूर्ण ठरतात, असे सांगून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, अशा नाट्यसंमेलनांमधून नवकलाकार उदयास आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य घडते. यातून स्थानिक कलाकारांना मंच उपलब्ध होतो. महाबळेश्वर येथे होत असलेल्या विभागीय नाट्यसंमेलनाप्रमाणेच राज्याच्या विविध जिल्ह्यांमध्ये नाट्य संमेलने होत आहेत. यातून गौरवशाली नाट्य संस्कृतीचा विस्तार दिग्गज कलाकार करत आहेत. नाट्यकलेमध्ये कार्य करणारे कलाकार हे सेवाभाव घेऊन नाट्य संस्कृती जोपासत असतात. कलेला जेंव्हा रसिक दाद देतात तेव्हांच कलाकार कला समृद्ध करू शकतो. यावेळी त्यांनी जेष्ठ कलाकार अशोक सराफ यांना महाराष्ट्र भूषण देऊन महाराष्ट्र शासनाने गौरव केल्याचेही सांगितले.

# चारा, पाण्यासह संपूर्ण टंचाई निवारण आढावा घेताना कोणतीही अडचण येणार नाही याची दक्षता घेण्याच्या सर्व यंत्रणांना स्पष्ट सूचना

**फलटण :** पिण्याच्या पाण्याच्या टँकरचे जीपीएस यंत्रणेद्वारे नियोजन, बियाणे वाटपाद्वारे चारा उत्पादनाचे नियोजन, रोहयोंतर्गत मजुरांना काम उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था, गरज पडली तर जनावरांसाठी छावण्यांचे नियोजन करुन प्रशासनाने कोणत्याही परिस्थितीत चारा, पाणी टंचाई आणि रोजगार याबाबत तक्रार येणार नाही असे उत्तम नियोजन करुन फलटण तालुक्यात टंचाई निवारणासाठी प्रशासन सज्ज असल्याचे स्पष्ट केले आहे.

प्रांताधिकारी सचिन ढोले यांच्या अध्यक्षतेखाली तहसील कार्यालयात आयोजित टंचाई आढावा बैठकीत तहसीलदार डॉ. अभिजित जाधव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उप अभियंता डी. पी. संत यांच्यासह वीज वितरण कंपनी, पंचायत समिती, पाटबंधारे खाते, सामाजिक वनीकरण, जिल्हा परिषद बांधकाम व लघु पाटबंधारे, पशू संवर्धन, वीज वितरण, कृषी वगैरे शासकीय यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते.

**१७ गावात १४ टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरु**

तालुक्यातील टंचाई घोषीत ४३ गावांपैकी १७ गावांमध्ये जनावरे व लोकवस्तीसाठी १४ टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येत असून प्रत्येक टँकरवर जीपीएस यंत्रणा बसविल्यामुळे टँकर गावात पोहोचला किंवा नाही याची खात्री करण्यात येत आहे, त्याशिवाय गावात रजिस्टर ठेवण्यात आले असून त्यावर ग्रामस्थांच्या सह्या घेतल्या जात आहेत. आगामी काळात पाणी टंचाई अधिक गावात निर्माण झाली तर टँकरची संख्या वाढविण्यात येणार असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

टँकर फिडिंग सेंटर वाढविणार : क्लोरीनेशन करणार



दरम्यान सध्या टँकर भरण्यासाठी फलटण नगर परिषद पाणी पुरवठा विभाग या एकाच फीडिंग पॉईंट आहे, त्याशिवाय गिरवी प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना, सुरवडी औद्योगिक वसाहत, लोणंद औद्योगिक वसाहत येथे टँकर भरण्याची व्यवस्था करावी, त्यामुळे अंतर कमी झाल्याने वेळ व पैशाची बचत तर होईल त्याबरोबर एकाच ठिकाणच्या व्यवस्थेत काही अडचण आल्यास पर्याय राहणार नसल्याने वरील प्रमाणे ४ ठिकाणी टँकर भरण्याची व्यवस्था प्राधान्याने करण्याच्या आणि आरोग्य विभागाने फिडींग पॉईंटवर पाण्यात जंतू नाशक टाकण्याची (क्लोरीनेशन) सूचना प्रांताधिकारी सचिन ढोले यांनी संबंधीत यंत्रणांना बैठकीत दिल्या.

**चारा उत्पादनाला प्राधान्य : मोफत बियाणे उपलब्ध:** आगामी काळात चारा टंचाई अधिक तीव्रतेने जाणवेल त्यावेळी बियाणे उपलब्ध करुन दिलेल्या शेतकऱ्यांकडून चारा उपलब्ध होणार असल्याची खात्री करुन घेताना ज्यांच्याकडे पाणी आणि चारा पिकासाठी क्षेत्र उपलब्ध आहे, त्यांनाच बियाणे द्या आणि त्यांनी चारा पीक घेतल्याची खात्री करण्याच्या सूचना संबंधीत यंत्रणांना बैठकीत करण्यात आल्या आहेत.

**नीरा उजवा कालवा लाभ क्षेत्रात करणार चारा पिके**

नीरा उजवा कालव्यातून दि. १० मार्च दरम्यान एक आवर्तन सुटणार असल्याने त्या भागातील शेतकऱ्यांना प्राधान्याने चारा बियाणे देवून चारा पिकांचे नियोजन करण्यात येत असून पशू संवर्धन आणि कृषी खात्यामार्फत १८७२ शेतकऱ्यांना मागणीप्रमाणे बियाणे उपलब्ध करुन देण्यात येत असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. कृषी खाते ३० क्विंटल आणि पशू संवर्धन विभाग २१३० क्विंटल मका बियाणे उपलब्ध झाले आहे. एकूण ११ मे. टन बियाणे उपलब्ध होणे अपेक्षित असल्याचे सांगण्यात आले.

**जलजीवन मिशन योजनांची कामे पूर्णत्वाच्या दिशेने वेगात सुरु :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या मार्फत केंद्रीय जलजीवन मिशन अंतर्गत तालुक्यात ११ नळ पाणी पुरवठा योजनांची कामे वेगात सुरु असून त्यापैकी वाठार निंबाळकर, गिरवी, सोमंथळी या ३ गावातील योजना मार्च आणि धूळदेव व आलगुडेवाडी योजना एप्रिल मध्ये आणि उर्वरित जून नंतर पूर्ण होतील अशी अपेक्षा असल्याचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उप अभियंता डी. पी. संत यांनी बैठकीत निदर्शनास आणून दिले.

# रामटेकडी इंडस्ट्रीयलमधील रस्त्याचा सिमा भिंतीमुळे फुटपाथ रस्ता गायब

## फॉरेस्ट विभागाची सिमा भिंत बांधकाम सुरु असल्याने रस्त्या होतोय अरुंद

**हडपसर :** रामटेकडी औद्योगिक वसाहतीतील रस्त्या लगत सध्या फॉरेस्ट विभागाचे कंपाऊंड भिंत बांधण्याचे काम चालू असून ती भिंत रामटेकडी औद्योगिक वसाहतीतील मधील डीपी रस्त्यास एक फुट ही जागा न ठेवता भिंतीचे बांधकाम करण्याचे काम सुरु आहे.रोडला लागून भिंत बांधत असल्याने येथील रस्ता अरुंद झाला असल्याने डिपी रस्त्याचा फुटपाथ गायब करण्यात आल्याने रामटेकडी औद्योगिक वसाहतीतील कामगारांना रस्त्यावरून जाण्यास फुटपाथ नसल्याने येथील रस्त्यावर रात्री अपरात्री अपघात होण्याचा धोका निर्माण झाला आहे.



वनविभागाच्या सीमा भिंतीचे काम सुरु असून रोडच्या बाजूस असलेल्या केबल लाईन उखडून ठेवलेल्या आहेत,कांही ठिकाणी खोदकाम करताना केबल लाईन तुटलेल्या असल्याने रामटेकडी इंडस्ट्रीयल मधील रस्त्यावरील खांबावरील लाईट बंद पडलेल्या असल्याचे वानवडी क्षेत्रीय कार्यालय. मनपा विद्युत विभागाचे सोनकांबळे यांनी सांगितले.

फॉरेस्ट की मनपा चा रस्ता या वादात सध्या रामटेकडी इंडस्ट्रीयल मधील डिपी रस्त्यावरील फुटपाथ मात्र गायब झाल्याने भविष्यात येथील रस्त्यावर फुटपाथ नसल्याने अपघात वाढण्याची शक्यता आहे.

फॉरेस्ट विभागाचे अधिकारी सांगतात की ,रामटेकडी इंडस्ट्रीयल मधील डिपी रस्ता हा आमच्या वनविभागाच्या जागेतून काढण्यात आलेला आहे, मनपा, रामटेकडी इंडस्ट्री आम्हास अडवू शकत नाही, आम्ही आमच्या पध्दतीने सिमा भिंत बांधत आहोत असे वनपरिक्षेत्र विभागाचे सुरेश वरक यांनी सांगितले.

# सकल मराठा समाजाचे मांजरी चौकात रास्ता रोको आंदोलन

## मनोज जरांगेच्या आवाहनाला हडपसरमधून प्रतिसाद

**हडपसर :** मराठा समाजाच्या आरक्षणासाठी व समाजाच्या विविध मागण्यांसाठी आंदोलन करणारे मनोज जरांगे यांनी केलेल्या आवाहनानुसार हडपसर मध्ये मांजरी फाटा चौक येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. सकल मराठा समाज हडपसरच्या वतीने आंदोलन करण्यात आले रास्ता रोको आंदोलनामुळे वाहतूक कोंडी काही काळ झाली होती.

एक मराठा लाख मराठा, मराठ्यांच्या ओबीसीमध्ये समावेश झाला पाहिजे, सग्यासोयऱ्यांचा अध्यादेश निघाला पाहिजे, अशा घोषणा देत मराठा आंदोलन आक्रमक झाले होते. हडपसर पोलिसांनी ठेवलेल्या बंदोबस्तामुळे संतप्त झालेले वातावरण आटोक्यात आले.

मराठा समाजाला ओबीसीतील आरक्षण मिळावे या मागणीसाठी आंतरवाली सराटी येथे उपोषण आंदोलन सुरू असताना महाराष्ट्र राज्य सरकारने दहा टक्के आरक्षण देऊन फसवणूक केल्याची



भूमिका मनोज जरांगे यांनी मांडली व मराठ्यांचा ओबीसी मध्ये समावेश झाला पाहिजे, सगेसोयऱ्यांचा आद्यादेशाचे कायदयात रूपांतर झाले पाहिजे, या आग्रही मागणीसाठी महाराष्ट्रात प्रत्येक ठिकाणी रास्ता रोको आंदोलन करावे. असा समन्वय समितीने आदेश दिला होता त्यानुसार हडपसर मधील सकल मराठा समाजाच्या वतीने मांजरी फाटा चौक विठ्ठल नगर येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

हडपसरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष पांढरे यांना मराठा समाजाच्या महिलांच्या हस्ते निवेदन देण्यात आले.आंदोलनात उच्चशिक्षित युवकही सहभागी झाले होते,

हडपसर सकल मराठा समाजाच्या वतीने मांजरी फाटा चौकात रास्ता रोको आंदोलन करण्यात आले या आंदोलन प्रसंगी डॉक्टर वकील व उच्चशिक्षित युवकही सहभागी झाले होते. आंदोलन करताना मराठा समाजाच्या बांधवांनी एकही रुग्णवाहिका अडकणार नाही तसेच शालेय विद्यार्थी व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही याची दक्षता घेतली होती.